आर.सी. सी. १८९/२०१२
निवृत्ती गंगाराम आव्हाड
वि. सोमा जैतु पारधी

## आदेश

१. प्रस्तुतची फिर्याद या न्यायालयात आरोपी क्र. १ ते ८ यांचे विरूध्द भा.दं.वि.संहिता कलम ४२०, ४०६, ४६८, ४६९, ४७०, ४७१, १२०(ब) सह कलम ३४ अन्वये दाखल झाली.

२. दि.२६/०४/२०१४ रोजी भा.दं.वि.संहिता कलम ४२०, ४६९, ४७०, ४७१, १२०(ब) सह कलम ३४ वरील कलमा अंतर्गत सर्व आरोपींविरूध्द फौ.प्र.संहिता कलम २०४ प्रमाणे आदेशीका जारी करण्यात आले. दि. २७/०६/२०१४ रोजी आरोपी क्र. १ ते ४ हजर झाले व त्यानंतर प्रकरण आरोपी क्र. ६ ते ७ यांच्या हजेरीकरीता प्रलंबित राहिले. दरम्यानच्या काळात आरोपी क्र. २ मंग्या पारधी मयत असल्याची पुरसिस नि.३५ कडे दाखल झाली व त्याचा मृत्यु दाखलाही हजर करण्यात आला. आरोपी क्र. ५ हा ही नि. २९ वरील वकिलपत्राने हजर झाला. परंतु उर्वरीत आरोपी क्र. ६, ७ व ८ यांचे विरूध्द वेळोवेळी समन्स व वॉरंटची बजावणी करूनही फिर्यादी त्यांना उपस्थित ठेवू शकला नाही व केसचे कामकाज पुढे चालविलेही नाही. जवळपास १० वर्षाहुन अधिक काळ प्रस्तुतची केस आरोपी क्र. ६, ७ व ८ च्या उपस्थितीकरीता प्रलंबित राहिली. दाखल कागदपत्रांवरून फिर्यादी हा सुध्दा दि. २३/०६/२०२२ पासून गैरहजर आहे. यावरून फिर्यादीला प्रस्तुतची केस पुढे चालविण्यात स्वारस्य नसल्याचे दिसत असल्याने सदरची केस अभिलेखावर पुन्हा प्रलंबित ठेवणे योग्य होणार नाही. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## -: आदेश :-

| | |
|---|---|
| १ | प्रस्तुतची फिर्याद फौ. प्र. सं. कलम २५६ अंतर्गत फिर्यादी गैरहजर व यांनी आरोपी क्र. ५ ते ८ करीता योग्य ती स्टेप्स घेतली नाही या कारणावरून काढून टाकण्यात येते. |
| २ | आरोपी क्र. १ ते ५ यांचा जामिन कदबा रद्द करण्यात येतो. |
| ३ | आरोपी क्र. १ ते ८ यांना भा.दं.वि.संहिता कलम ४२०, ४६९, ४७०, ४७१, १२०(ब) सह कलम ३४ गुन्हयातून दोषमुक्त करण्यात येते. |

Sd/-

दिनांक - १३/०३/२०२६

**(श्रीमती यु. पी. कोळी)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, शहापूर